# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** मौजा-नागपूर ख.क्र.४१४, गणेशपेठ, नागपूर स्थित जागेवरील
**{स्थावर विभाग}** मंजूर अभिन्यातील मोकळ्या जागेवरील सामाजिक सभागृह तसेच विरंगुळा केंद्र मे. राहुल कॉम्पलेक्स १, विंग-१,२,३ गाळेधारकांची देखभाल सह.गृह.नि.संस्था मर्या., नागपूर (रजि नं. NGP/CTY-२/SHG/TCI/७२१/२०१४) यांना देखभाल दुरुस्ती व व्यवथापनेसाठी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

मौजा-नागपूर ख.क्र.४१४ राहुल कॉम्पलेक्स १, गणेशपेठ, नागपूर स्थित जागेवरील नागपूर सुधारप्रन्यासतर्फे अभिन्यासाला मंजूरी प्राप्त आहे. सदर अभिन्यासातील मोकळी जागा पत्र क्र. वि.अ.(दक्षिण) १४९८ दि. २२.०१.२०२५ अन्वये नागपुर सुधार प्रन्यासतर्फे नागपूर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. या अभिन्यासातील मोकळया जागेवर मा. आमदारांच्या स्थानिक क्षेत्र विकास निधीतुन सामाजीक सभागृह (क्षेत्र – १२.४० x ७.६० = ९४.२४ चौ.मी.) तसेच विरंगुळा केंद्र (क्षेत्र – ६.१० x ९.०५ = ५५.२० चौ.मी.)बांधण्यात आलेले आहे. उक्त सामाजिक सभागृह इमारत व विरंगुळा केंद्राची इमारत मे. राहुल कॉम्पलेक्स १, विंग-१,२,३ गाळेधारकांची देखभाल सह.गृह.नि.संस्था मर्या., नागपूर (रजि नं. NGP/CTY-२/SHG/TCI/७२१/२०१४) या संस्थेकडे एकात्मीक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील तरतुदीन्वये मा. आयुक्त महोदयांनी खालील अटी व शर्तीला अधिन राहुन दि. २३.०९.२०२४ रोजी देखभाल दुरुस्ती व व्यवस्थानेकरीता देण्याचे प्रस्तावास मंजुरी प्रदान केली.

**<u>अटी व शर्ती :-</u>**

१) मे. राहुल कॉम्पलेक्स १, विंग-१,२,३ गाळेधारकांची देखभाल सह.गृह.नि.संस्था मर्या., नागपूर (रजि नं. NGP/CTY-२/SHG/TCI/७२१/२०१४) या संस्थेस UDCPR मधील तरतुद क्र. 3.4.7(v) अन्वये, नाममात्र रु. १/- वार्षिक दरावर ३ वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर समाजभवन इमारत व विरंगुळा केंद्राची इमारत संनियंत्रण/संचालनाकरीता देण्यात येईल.

२) सदर समाजभवन व विरंगुळा केंद्राचे इमारतीचे पालकत्व देण्यात येत असून सदर इमारतीचे मालकी हक्क नागपूर महानगरपालिकेकडे कायम राहील. तसेच उक्त इमारतीचा वापर सार्वजनिक व नियोजीत कार्यासाठीच राहील.

३) संबंधीत संस्थेला या समाजभवन व विरंगुळा केंद्राचे इमारतीपासुन कोणतेही आर्थिक उत्पन्न घेता येणार नाही.

४) सदर समाजभवन व विरंगुळा केंद्राचे इमारत कुणालाही पोटभाड्याने देता येणार नाही.

५) निश्चित केलेल्या कालावधीत सदर इमारतींची देखभाल व रखरखावची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील. त्यानुसार संस्थेला चौकीदार नियुक्त करावा लागेल.

६) सदर इमारतींचा वापर ज्या प्रयोजनासाठी आहे, तोच नियोजीत वापर करणे आवश्यक राहील. इतर वापर आढळल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

७) सदर्हु इमारतींमधील साहित्याच्या नुकसानी बद्दल संस्था जबाबदार राहील, नुकसान झाल्यास संस्थेस नुकसान भरपाई करुन द्यावी लागेल. नुकसान भरपाई नोटिसपासुन १५ दिवसाच्या

आत भरपाई न केल्यास, त्याबद्दल मनपाने ठरविलेली भरपाई रक्कम वसुल करण्यात येईल. सदर नुकसान भरपाई १ महिण्याच्या आत भरणा न केल्यास संस्थेची परवानगी रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहील.

८) इमारतींमध्ये विजेची व पाण्याची व्यवस्था स्वखर्चाने संस्थेस करावी लागेल. मनपा कर, विज कर, पाणी कराचा भरणा करणे ही जबाबदारी संस्थेची राहील.

९) इमारतींच्या विद्यमान बांधकामात फेरबदल पुर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.

१०) सदर इमारतींची महानगरपालिकेस आवश्यकता भासल्यास, १ महीण्याची पुर्व सुचना देवून खाली करुन घेण्यात येईल.

११) संस्थेस सदर इमारती इतरांना हस्तांतरण, गहाण, तारण करता येणार नाही. तसेच इतर संस्थेस/व्यक्तीशी भागीदारी करता येणार नाही.

१२) मनपा अधिकारी/कर्मचारी वर्गाला वेळोवेळी स्थळ निरीक्षणाचे अधिकार अबाधीत राहील.

१३) संस्थेच्या परिसरात कोणतीही अप्रीय घटना घडुन प्राणहाणी व वित्तहानी झाल्यास, हयाबाबतची सर्व जबाबदारी संस्थेची राहील, यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

१४) संस्थेनी उपरोक्त नमुद अटीचे उल्लघंन केल्यास, मा. आयुक्त यांचेकडुन नियुक्त अधिकाऱ्यास करार रद्द करण्याचे अधिकार अबाधीत राहील. व संस्थेस कोणतीही नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार राहणार नाही.

१५) नागपूर महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाचे आदेश क्र. सा.प्र.वि/प्रशा/१८ दि. २५.०२.२०२० अन्वये सदर्हु इमारतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी धंतोली झोन क्र. ४ चे कार्यकारी अभियंता हे क्षेत्रिय स्थावर अधिकारी म्हणुन कार्यरत राहील.

करीता उपरोक्त अटी व शर्तीला अधीन राहून, नागपूर शहराअंतर्गत महानगरपालिकेच्या अख्त्यारीत असलेल्या क्षेत्रातील, स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत आमदार निधीतून बांधण्यात आलेले सामाजीक सभागृह (क्षेत्र- १२.४० x ७.६० = ९४.२४ चौ.मी.) तसेच विरंगुळा केंद्र (क्षेत्र- ६.१० x ९.०५ = ५५.२० चौ.मी.) नाममात्र रु. १/- शुल्क आकारणी करुन नोंदणीकृत सामाजिक/विश्रवस्त संस्थेकडे म्हणजेच राहुल कॉम्प्लेक्स-१, विंग-१,२,३ गाळेधारकांची देखभाल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नागपूर रंजि नं. (NGP/CTY-२/HSG/(TCI)७२१/२०१४) या संस्थेला, ३ वर्षे कालावधीकरीता देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापनेकरीता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

(मा. आयुक्त महोदयांचे दि. ०३.०६.२०२५ रोजीचे मंजूरीनुसार)

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 24/मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 16/06/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, स्थावर विभागयांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मौजा-नागपूर ख.क्र.४१४, गणेशपेठ, नागपूर स्थित जागेवरील

मंजूर अभिन्यातील मोकळया जागेवरील सामाजिक सभागृह तसेच विरंगुळा केंद्र मे. राहुल कॉम्पलेक्स १, विंग-१,२,३ गाळेधारकांची देखभाल सह.गृह.नि.संस्था मर्या., नागपूर (रजि नं. NGP/CTY-२/SHG/TCI/७२१/२०१४) यांना देखभाल दुरुस्ती व व्यवथापनेसाठी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

मौजा-नागपूर ख.क्र.४१४ राहुल कॉम्पलेक्स १, गणेशपेठ, नागपूर स्थित जागेवरील नागपूर सुधारप्रन्यासतर्फे अभिन्यासाला मंजूरी प्राप्त आहे. सदर अभिन्यासातील मोकळी जागा पत्र क्र. वि.अ. (दक्षिण) १४९८ दि. २२.०१.२०२५ अन्वये नागपुर सुधार प्रन्यासतर्फे नागपूर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. या अभिन्यासातील मोकळया जागेवर मा. आमदारांच्या स्थानिक क्षेत्र विकास निधीतुन सामाजीक सभागृह (क्षेत्र – १२.४० x ७.६० = ९४.२४ चौ.मी.) तसेच विरंगुळा केंद्र (क्षेत्र – ६.१० x ९.०५ = ५५.२० चौ.मी.)बांधण्यात आलेले आहे. उक्त सामाजिक सभागृह इमारत व विरंगुळा केंद्राची इमारत मे. राहुल कॉम्पलेक्स १, विंग-१,२,३ गाळेधारकांची देखभाल सह.गृह.नि.संस्था मर्या., नागपूर (रजि नं. NGP/CTY-२/SHG/TCI/७२१/२०१४) या संस्थेकडे एकात्मीक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील तरतुदीन्वये मा. आयुक्त महोदयांनी खालील अटी व शर्तीला अधिन राहुन दि. २३.०९.२०२४ रोजी देखभाल दुरुस्ती व व्यवस्थानेकरीता देण्याचे प्रस्तावास मंजुरी प्रदान केली.

**<u>अटी व शर्ती :-</u>**

१) मे. राहुल कॉम्पलेक्स १, विंग-१,२,३ गाळेधारकांची देखभाल सह.गृह.नि.संस्था मर्या., नागपूर (रजि नं. NGP/CTY-२/SHG/TCI/७२१/२०१४) या संस्थेस UDCPR मधील तरतुद क्र. 3.4.7(v) अन्वये, नाममात्र रु. १/- वार्षिक दरावर ३ वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर समाजभवन इमारत व विरंगुळा केंद्राची इमारत संनियंत्रण/संचालनाकरीता देण्यात येईल.

२) सदर समाजभवन व विरंगुळा केंद्राचे इमारतीचे पालकत्व देण्यात येत असून सदर इमारतीचे मालकी हक्क नागपूर महानगरपालिकेकडे कायम राहील. तसेच उक्त इमारतीचा वापर सार्वजनिक व नियोजीत कार्यासाठीच राहील.

३) संबंधीत संस्थेला या समाजभवन व विरंगुळा केंद्राचे इमारतीपासुन कोणतेही आर्थिक उत्पन्न घेता येणार नाही.

४) सदर समाजभवन व विरंगुळा केंद्राचे इमारत कुणालाही पोटभाड्याने देता येणार नाही.

५) निश्चित केलेल्या कालावधीत सदर इमारतींची देखभाल व रखरखावची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील. त्यानुसार संस्थेला चौकीदार नियुक्त करावा लागेल.

६) सदर इमारतींचा वापर ज्या प्रयोजनासाठी आहे, तोच नियोजीत वापर करणे आवश्यक राहील. इतर वापर आढळल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

७) सदर्हु इमारतींमधील साहित्याच्या नुकसानी बद्दल संस्था जबाबदार राहील, नुकसान झाल्यास संस्थेस नुकसान भरपाई करुन द्यावी लागेल. नुकसान भरपाई नोटिसपासुन १५ दिवसाच्या आत भरपाई न केल्यास, त्याबद्दल मनपाने ठरविलेली भरपाई रक्कम वसुल करण्यात येईल. सदर नुकसान भरपाई १ महिण्याच्या आत भरणा न केल्यास संस्थेची परवानगी रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहील.

८) इमारतींमध्ये विजेची व पाण्याची व्यवस्था स्वखर्चाने संस्थेस करावी लागेल. मनपा कर, विज कर, पाणी कराचा भरणा करणे ही जबाबदारी संस्थेची राहील.

९) इमारतींच्या विद्यमान बांधकामात फेरबदल पुर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.

१०) सदर इमारतींची महानगरपालिकेस आवश्यकता भासल्यास, १ महीण्याची पुर्व सुचना देवून खाली करुन घेण्यात येईल.

११) संस्थेस सदर इमारती इतरांना हस्तांतरण, गहाण, तारण करता येणार नाही. तसेच इतर संस्थेस/व्यक्तीशी भागीदारी करता येणार नाही.

१२) मनपा अधिकारी/कर्मचारी वर्गाला वेळोवेळी स्थळ निरीक्षणाचे अधिकार अबाधीत राहील.

१३) संस्थेच्या परिसरात कोणतीही अप्रीय घटना घडुन प्राणहाणी व वित्तहानी झाल्यास, हयाबाबतची सर्व जबाबदारी संस्थेची राहील, यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

१४) संस्थेनी उपरोक्त नमुद अटीचे उल्लघंन केल्यास, मा. आयुक्त यांचेकडुन नियुक्त अधिकाऱ्यास करार रद्द करण्याचे अधिकार अबाधीत राहील. व संस्थेस कोणतीही नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार राहणार नाही.

१५) नागपूर महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाचे आदेश क्र. सा.प्र.वि/प्रशा/१८ दि. २५.०२.२०२० अन्वये सदर्हु इमारतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी धंतोली झोन क्र. ४ चे कार्यकारी अभियंता हे क्षेत्रिय स्थावर अधिकारी म्हणुन कार्यरत राहील.

करीता उपरोक्त अटी व शर्तीला अधीन राहून, नागपूर शहराअंतर्गत महानगरपालिकेच्या अख्त्यारीत असलेल्या क्षेत्रातील, स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत आमदार निधीतून बांधण्यात आलेले सामाजीक सभागृह (क्षेत्र- १२.४० x ७.६० = ९४.२४ चौ.मी.) तसेच विरंगुळा केंद्र (क्षेत्र- ६.१० x ९.०५ = ५५.२० चौ.मी.) नाममात्र रु. १/- शुल्क आकारणी करुन नोंदणीकृत सामाजिक/विश्रवस्त संस्थेकडे म्हणजेच राहुल कॉम्प्लेक्स-१, विंग-१,२,३ गाळेधारकांची देखभाल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नागपूर रंजि नं. (NGP/CTY-२/HSG/(TCI)७२१/२०१४) या संस्थेला, ३ वर्षे कालावधीकरीता देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापनेकरीता देण्याच्या प्रस्तावास मा.प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.